# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)

जा.क्र./महा.वि./गो.वि./2661 /२०२२ दिनांक : 10 /०६/२०२२


## :: परिपत्रक ::

विषय:— विद्याविषयक लेखापरिक्षण व संलग्निकरण शुल्काबाबत...

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीशी संलग्नित सर्व संस्थाप्रमुख व प्राचार्य यांना कळविण्यात येते कीं, दि. ०६ मे २०२० रोजी संपन्न झालेल्या मा. व्यवस्थापन परिषदेतील बाब क्र. ४५ अन्वये खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

'' उक्त बाबीवर सभेत सविस्तर चर्चेअंती संलग्निकरण शुल्क दरवर्षी घेण्यात यावे असे ठरविण्यात आले. ज्या महाविद्यालयांना 'अ' श्रेणी प्राप्त झाली आहे. आणि तीन वर्षाचे संलग्निकरण प्राप्त झाले आहे. अशा महाविद्यालयांना तीन वर्षाकरीता विद्याविषयक लेखापरिक्षणाचे शुल्क भरावे लागणार नाही. विद्यापीठाची प्रचलीत पद्धतीनुसारच संलग्निकरण शुल्क व विद्याविषयक लेखा परिक्षण शुल्क आकारण्यात यावे असा सर्वानुमते ठराव पारीत करण्यात आला.''

१. वरील प्रमाणे झालेल्या निर्णयानुसार ज्या महाविद्यालयांना एकापेक्षा जास्त वर्षाकरीता निरंतर संलग्निकरण प्रदान करण्यात आलेले असले तरी त्यांना **प्रत्येक वर्षाकरीता दरवर्षी संलग्निकरण शुल्क भरणे अनिवार्य आहे**.

२. ज्या महाविद्यालयांना विद्याविषयक लेखापरिक्षणामध्ये ''अ'' श्रेणी प्राप्त झाली आहे आणि तीन वर्षाचे संलग्निकरण प्राप्त झाले आहे. अशा महाविद्यालयांना तीन वर्षाकरीता **विद्याविषयक लेखापरिक्षणाचे शुल्क भरावे लागणार नाही**.

३. परंतु संलग्नित महाविद्यालयांना विद्याविषयक लेखापरिक्षणाद्वारे (एक, दोन किंवा तीन वर्षापर्यंत ) ज्या वर्षापर्यंत संलग्निकरण प्रदान करण्यात आलेले आहे. **त्यापुढील वर्षाकरीता विद्याविषयक लेखापरिक्षणाद्वारे संलग्निकरण प्राप्त करून घेण्यासाठी विद्याविषयक लेखापरिक्षण शुल्क भरणे अनिवार्य राहील**. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

मा. व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयान्वये,

10.6.2022

डॉ. अनिल झेड. चिताडे
कुलसचिव प्र.
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रतलिपी:—१. मा. कुलगुरू महोदय यांचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र— कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. वित्त व लेखा अधिकारी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४. मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.